सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in    Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577    Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : विकाअ/शिक्षण/स्वा.अ.म./२०२३/ 2231
दिनांक : 08 AUG 2023

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्य " मेरी माटी, मेरा देश " हा उपक्रम साजरा करण्याबाबत ..**
**संदर्भ :** १) या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/स्वा.अ.म./२०२३/२२१० दिनांक ०७/०८/२०२३
२ संचालक,तंत्र शिक्षण, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक १६/आस्था/स्वाअमहोत्सव/२०२३/२०५ दिनांक ७ ऑगस्ट २०२३

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.प्रधान सचिव,सांस्कृतिक कार्य,यांचे दि.२७.०७.२०२३ च्या पत्रान्वये, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त " मेरी माटी, मेरा देश " या अभियानामध्ये प्रत्येक विभागाची भूमिका व जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून, सर्व महाविद्यालयात या अभियाबाबत जनजागृती करुन विविध सुसंगत कार्यक्रम घेण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्याअनुषंगाने सदर " मेरी माटी, मेरा देश " या उपक्रमांतर्गत नेमून दिलेल्या भूमिकेची अंमलबजावणी करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भ क्र.१ चे पत्रानुसार कळविण्यात आले आहे.

तसेच याप्रत्राव्दारे असे कळविण्यात येते की, **दि.०९.०८.२०२३ रोजी सकाळी १०.०० वा.** आपल्या संस्थेतील विद्यार्थी/अधिकारी/कर्मचारी यांनी पंचप्राण शपथ घ्यावी (शपथेचा मराठी नमुना सोबत जोडलेला आहे) व शपथ घेतानाची सेल्फी https://yuva.gov.in/meri_maati_mera_desh या वेबसाईट वर अपलोड करण्यात यावी. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत दिलेल्या विवरणपत्रांमध्ये माहितीसह (Exel Sheet) हार्ड व सॉफ्ट कॉपीसह दिनांक १६.०८.२०२३ न चुकता सादर करावा.

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

**(श्री.म.म.अंधारे)**
**सहाय्यक संचालक, (तांत्रिक)**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:१. मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना सविनय सादर.
२. **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त "मेरी माटी, मेरा देश" हा उपक्रम साजरा करण्याबाबत माहितीचे विवरणपत्र

विभागीय कार्यालयाचे नांव :

| अ.क्र. | संस्थेचे नांव | संस्था/ महाविदयालयातील विदयार्थी व व्याख्यात्यांनी पंचप्रण शपथ घ्यावी व शपथ घेतानाची सेल्फी https://yuva.gov.in/meri_maati_mera_desh या वेबसाईट वर अपलोड करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल | जिल्हाप्रशासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत या निमित्ताने आयोजित करण्यात येणा-या उपक्रमांत सक्रीय सहभाग नोंदविण्याबाबत विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशिल | पालकांना या उपक्रमाबाबत डायरी नोट्स, परिपत्रके इ. विविध माध्यमांव्दारे अवगत करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल | संस्थांमध्ये "मेरी माटी, मेरा देश" या उपक्रमांतर्गत एका विशेष सभेचे आयोजन करुन कार्यक्रम राबविण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल | विभागातंर्गत येणाऱ्या स्थानीय शूरवीरांचा सन्मान करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

# वर नमूद विवरणपत्रातील माहिती सहसंचालक, विभागीय कार्यालय यांचे स्तरावर एकत्रितरित्या संकलित करुन सादर करण्यात यावी. विभागातंर्गत संस्थानिहाय माहिती या संचालनालयास न पाठविण्याबाबतच्या सूचना संबंधीत संस्थांना विभागीय कार्यालय स्तरावरुन देण्यात याव्यात.


C:\Users\DESK16\Desktop\sumita copy folder\sumita\mis\sankirn\sankirn letter15.12.21.docx

# पंचप्रण शपथेचा नमूना

आम्ही शपथ घेतो की :

- भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करु.
- गुलामीची मानसिकता मूळापासून नष्ट करु.
- देशाच्या समृध्द वारशाचा गौरव करु.
- भारताची एकात्मता बलशाली करु आणि देशाचे संरक्षण करणाऱ्यांप्रती सन्मान बाळगू.
- देशाचे नागरीक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करु.

**

(स्वाक्षरी)

Scanned with CamScanner